प्रेरणा
को – ऑप. बँक लिमिटेड

PRERANA
CO-OP. BANK LTD.

मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे – 411 033.**फोन :**9075028001/2



28 वा
वार्षिक अहवाल
2025-26

स्फुर्तीस्थान



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व लोकनेते

मा. ना. अजितदादा पवार साहेब


(१९५९ - २०२६)

महाराष्ट्राच्या विकासासाठी आयुष्यभर अथक परिश्रम घेणारे, जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारे,
आपल्या कार्यातून महाराष्ट्राच्या राजकारणात अमिट ठसा उमटविणारे
आणि सहकार क्षेत्राची सखोल जाण असलेले
लोकनेते अजितदादा पवार साहेब यांना
भावपूर्ण स्मृतिसुमन !

त्यांचे कार्य, विचार आणि प्रेरणादायी नेतृत्व
आमच्या सदैव स्मरणात राहील.

प्रेरणा को-ऑप. बँक लि.
सर्व संचालक मंडळ, सेवकवृंद, सभासद व खातेदार

आधारस्तंभ



पद्मविभूषण मा. श्री. शरद्‌चंद्रजी पवार साहेब
मा. कृषी मंत्री (भारत सरकार)



मा. श्री. तुकारामभाऊ गुजर
संस्थापक-संचालक



मा. श्री. कांतीलाल तुकारामभाऊ गुजर
चेअरमन



श्री तुकारामभाऊ गुजर
संस्थापक/संचालक



श्री कांतीलाल गुजर
चेअरमन



श्री. गबाजी वाकडकर
व्हा. चेअरमन

संचालक मंडळ



श्री. श्रीधर वाल्हेकर



श्री. सुरेश पारखी



श्री. संजय पठारे



श्री. संतोष मुंगसे



कु. अक्षय गुजर



श्री. जगन्नाथ (नाना) शिवले



सी.ए. श्री. नंदकिशोर तोष्णीवाल



ॲड. अजितकुमार जाधव



श्री. राजाराम रंदिल



श्री. राजेंद्र शिरसाठ



सौ. सुजाता पारखी



सौ. चंद्रभागा भिसे



श्री. तानाजी सोनवणे
मुख्य कार्यकारी अधिकारी – दि. १५/०६/२०२६ पर्यंत



श्री. किरण शेळके
मुख्य कार्यकारी अधिकारी – दि. १६/०६/२०२६ पासून

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

प्रेरणा को-ऑप. बँक लि., थेरगांव, पुणे. या बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार,दि. ०९/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे - ४११०३३ येथे खालील विषयांवर कामकाज करण्यासाठी घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय

१) मागील दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने तयार केलेला सन २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल, ३१ मार्च २०२६ चा ताळेबंद आणि सन २०२५-२६ चे नफा तोटा पत्रक स्वीकृत करणे व सभासदांकडून अहवालासंबंधी आलेल्या लेखी प्रश्न/सूचनांचा विचार करणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

४) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे. तसेच सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५) मा. वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेल्या सन २०२५-२६ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व सन२०२४-२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेणे.

६) मा. संचालक मंडळाने सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीस व मेहेनतान्यास मान्यता देणे.

७) सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता नेमणूक केलेल्या अंतर्गत व कंकरंट लेखापरिक्षकांच्या नियुक्तीस व मेहेनतान्यास मान्यता देणे.

८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम (७५) नुसार बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

९) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे

१०) बँकेचे सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये तडजोड योजनेमध्ये बंद झालेल्या कर्ज खात्यांना मंजुरी देणे व बँकेने तयार केलेल्या तडजोड योजनेच्या मुदत वाढीस मान्यता देणे

११) सेवकांच्या रचनेस मान्यता देणे.

१२) २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करण्याबाबत निर्णय घेणे.

१३) मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ : पुणे
दिनांक : २५/०८/२०२६

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
श्री. किरण बाळकृष्ण शेळके
मुख्य कार्यकारी अधिकारी

सभासदांसाठी विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास, ही सभा त्याच दिवशी सकाळी १०.३० वाजता सभा सुरु होईल व विषय पत्रिकेनुसार सभेचे कामकाज होईल. त्यावेळी गणसंख्या पुर्तीची आवश्यकता असणार नाही.

२.) मा. सभासदांना सन २०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालाची प्रत मिळाली नसल्यास ती बँकेच्या मुख्य कार्यालय / शाखामध्ये प्राप्त होईल तसेच बँकेच्या www.prerana.bank.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

३) मा. सभासदांना वरील विषयांसंबंधी काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात दि. ०५/०९/२०२६ अखेर बँकेच्या कामकाजाच्या वेळेत मुख्य कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात/द्याव्यात.

४) दि. ०९/०९/२०२६ रोजी वार्षिक सभेचे कामकाज संपल्यानंतर सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे तरी सर्व सभासदांनी प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये अवश्य सहभाग घ्यावा.

परिशिष्ट 'अ'

बँकेचे नांव	:	**प्रेरणा को-ऑप. बँक लि.**		
मुख्य कार्यालयाचा पत्ता	:	लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे - ४११ ०३३.		
नोंदणी क्रमांक व दिनांक	:	पी.एन.ए./बी.एन.के.-११५/सन १९९८ दि. २४ मार्च १९९८		
रिझर्व्ह बँकेकडून मिळालेला परवाना क्रमांक	:	यु.बी.डी. महाराष्ट्र१६३२ पी.		
व दिनांक	:	दि. ५ ऑक्टोबर १९९८		
बँकेचे कार्यक्षेत्र	:	संपूर्ण महाराष्ट्र राज्य		
मुख्य कार्यालयासह शाखा विस्तार	:	**१६** (१५ शाखा + १ मुख्य कार्यालय)		
सभासद संख्या	:	नियमित : **१२५१२** नाममात्र : २०१४ **एकुण : १४५२६**		
तपशील	:	**₹ (लाखात)**	**३१/३/२०२५**	**३१/३/२०२६**
वसुल भागभांडवल	:		१३२१.७१	१३७३.८६
राखीव निधी	:		६८२४.८८	७५८१.९५
ठेवी		बचत ठेवी	११३७१.३५	१३५२७.४३
		चालु ठेवी	३९२६.७३	४९४३.३५
		मुदत ठेवी	३३४२३.२२	३७४१२.२४
	:	**एकुण ठेवी**	**४८७२१.३०**	**५५८८३.०२**
कर्जे	:	तारणी	२३२००.०४	२७८९७.८८
		विनातारणी	३६८०.०३	४०१७.१३
		एकुण कर्जे	**२६८८०.०७**	**३१९१५.०१**
बाहेरील देणी	:		NIL	NIL
थकबाकी	:		८०३.८१	११५३.१६
नफा	:		६९७.०९	७३२.८१
खेळते भांडवल	:		५६५८६.४९	६५८२२.९२
सेवक	:		अधिकारी :	६२
			इतर (कायम व प्रशिक्षणार्थी) :	९५
			एकूण :	**१५७**

चेअरमन यांचे मनोगत



प्रिय सभासद बंधु आणि भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

बँकेचा २८ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला विशेष आनंद व समाधान वाटत आहे. सध्याच्या जागतिक घडामोडींचा अर्थकारणावर मोठा प्रभाव पडत असतो. एकच ध्येय, अंतिम विचार – विना सहकार नाही उद्धार! या तत्वावर विश्वास ठेवून, अर्थव्यवस्थेतील चढ-उतारांचा समतोल राखत, आपल्या सर्वांच्या सहकार्याने व विश्वासाने बँक प्रगतीपथावर वाटचाल करत आहे.

गेल्या २८ वर्षांच्या प्रवासात आपल्या बँकेने उल्लेखनीय भरारी घेतली आहे. दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी बँकेच्या ठेवी ₹ ५५८.८३ कोटी व कर्जे ₹ ३१९.१५ कोटी असून एकूण व्यवसाय ₹ ८७७.९८ कोटी इतका झाला आहे. सन २०२५ – २०२६ या आर्थिक वर्षासाठी ठरविण्यात आलेली ठेवी व कर्जाची उद्दिष्टे शाखांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहेत. यावर्षीही ०% एन.पी.ए. राखण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे. सन २०२६ – २०२७ या वर्षात बँकेचा एकूण व्यवसाय रु. १०६० कोटींहून अधिक करण्याचे ध्येय आपण समोर ठेवले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यात 'स्वायत्तता', 'लोकशाही नियंत्रण', 'व्यावसायिकता', 'कडक व स्वतंत्र लेखापरीक्षण' यांसारखे महत्त्वाचे बदल करण्यात आले असून त्यामुळे व्यवस्थापनाची जबाबदारी वाढली आहे. संचालक मंडळ, अधिकारी, सेवकवर्ग, ठेवीदार, कर्जदार, खातेदार व हितचिंतक यांच्या सहकार्याने ही जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली जात आहे. त्यामुळेच आपली बँक सहकार क्षेत्रातील एक आदर्श व कार्यक्षम संस्था म्हणून ओळख निर्माण करू शकली आहे.

मुक्त अर्थव्यवस्था व स्पर्धात्मक युगात गुणवत्ता टिकवणे ही मोठी जबाबदारी आहे. बँकेने ही जबाबदारी गतवर्षीप्रमाणे यंदाही यशस्वीरीत्या पार पाडली आहे. रिझर्व्ह बँक व सहकार खात्याच्या धोरणांचा, जागतिक घडामोडींचा व स्पर्धात्मक वातावरणाचा विचार करून, ग्राहकांचा विश्वास जपत बँकेची प्रगतीची घोडदौड सुरू आहे.

आधुनिक काळात तंत्रज्ञानाची सांगड घालून बँकेने ग्राहकांसाठी डिजिटल सेवा सुरू केल्या आहेत. एटीएम, मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट यांद्वारे पैसे हस्तांतरण, वीज बिल, पाणी बिल, रिचार्ज, विमा हप्ते, कर भरणा इत्यादी व्यवहार सहजपणे करता येतात. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्कृष्ट सेवा देण्यास बँक कटिबद्ध आहे.

बँकिंग क्षेत्रातील आव्हाने :

नागरी सहकारी बँकांसमोर सायबर सुरक्षा, आयकर भार, तंत्रज्ञान खर्च, स्पर्धा, सायबर गुन्हे, तरलता व्यवस्थापन, नियामक बदल अशा अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या सर्व अडचणींवर मात करून बँक उज्ज्वल भवितव्याकडे वाटचाल करत राहील, असा मला विश्वास आहे.

सामाजिक बांधिलकी :

आपली बँक सामाजिक कार्यातही अग्रस्थानी आहे. सेवक कलागुण सांस्कृतिक कार्यक्रम, प्रेरणा माझी वारी अंतर्गत शबनम बॅग, ज्यूट पाऊच वाटप, स्वच्छता अभियान, ग्राहक व उद्योजक मेळावे, आरोग्य शिबिरे, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, तसेच ज्येष्ठ सभासदांचा गौरव अशा अनेक उपक्रमांचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. यावर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ६१ वर्ष पूर्ण केलेल्या सभासदांचा 'प्रेरणा जीवन गौरव' पुरस्कार व ७४ वर्ष पूर्ण केलेल्या सभासदांचा 'अमृत महोत्सवी मानपत्र' देऊन सन्मान' करण्यात येणार आहे.

यावर्षी संचालक मंडळाने सभासदांना ११% दराने लाभांश देण्याची शिफारस केली आहे. सभासदांनी त्यास मान्यता द्यावी, ही नम्र विनंती.

बँकेचे संस्थापक-संचालक श्री. तुकारामभाऊ गुजर, सर्व संचालक, अधिकारी, सेवक वर्ग, सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक या सर्वांचा मी ऋणी आहे.

सर्व सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहून आर्थिक वर्ष २०२५ – २६ चा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मान्यता द्यावी, ही विनंती.

आपला अमूल्य विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. सामाजिक बांधिलकी, सहकार, प्रगती व भरारी यांचा ध्यास घेऊन आपण सर्वजण एकत्रितपणे उज्ज्वल आर्थिक भविष्य घडवूया.

जगद्गुरू तुकोबारायांच्या वचनाप्रमाणे एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ!

धन्यवाद !

श्री कांतीलाल तुकारामभाऊ गुजर
चेअरमन, प्रेरणा को- ऑप. बँक लि.

२८ वा वार्षिक अहवाल

मा. सभासद बंधु भगिनींनो,

आपल्या बँकेचा २८ वा वार्षिक अहवाल सादर करताना संचालक मंडळाला अतिशय आनंद होत आहे. अहवालासोबत ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक जोडले आहे.

आर्थिक व सांपत्तिक स्थितीचा आढावा :

अहवाल सालामध्ये बँकेने दरवर्षीप्रमाणे प्रगती केली असुन ही गोष्ट खाली दिलेल्या तुलनात्मक आकडेवारीवरुन लक्षात येईल

₹ लाखात

	३१/०३/२०२५	३१/०३/२०२६	+ वाढ/ – घट
वसुल भागभांडवल	१३२१.७१	१३७३.८६	५२.१५
राखीव निधी व अन्य निधी	६८२४.८८	७५८१.९५	७५७.०७
ठेवी	४८७२१.३०	५५८८३.०२	७१६१.७२
कर्जे	२६८८०.०७	३१९१५.०१	५०३४.९४
गुंतवणुक / मुदत ठेवी	२७१७१.४२	३०५१३.७८	३३४२.३६
खेळते भांडवल	५६५८६.४९	६५८२२.९२	९२३६.४३
ढोबळ नफा	१०३६.४३	११८४.७४	१४८.३१
निव्वळ नफा	**६९७.०९**	**७३२.८१**	**३५.७२**

सभासद :

दि. ३१/३/२०२५ रोजीच्या ११६०७ या सभासद संख्येत अहवाल वर्षामध्ये ११२४ नवीन सभासदांची वाढ झाली असून २१९ सभासदांचे सदस्यत्व राजीनामा, मृत्यु इत्यादी कारणांमुळे रद्द झाले आहे. दि. ३१/३/२०२६ अखेर १२५१२ सभासद संख्या झाली आहे..बँकेच्या कर्जदार नाममात्र सभासदांची संख्या दि. ३१/३/२०२६ रोजी २०१४ असून नियमित सभासदांशी नाममात्र सभासदांचे प्रमाण १६.१० % आहे.

ठेवी :

दि. ३१/३/२०२५ रोजी बँकेच्या एकुण ठेवी ₹ ४८७.२१ कोटी इतक्या होत्या त्यामध्ये अहवाल वर्षामध्ये ₹ ७१.६२ कोटी ने वाढ झाली असून दि. ३१/३/२०२६ रोजी बँकेच्या एकुण ठेवी ₹ ५५८.८३ कोटी आहेत.

(₹ लाखात)

ठेव प्रकार	मार्च २०२५	मार्च २०२६	एकुण ठेवींशी प्रमाण
बचत ठेवी	११३७१.३५	१३५२७.४३	२४.२१ %
चालु ठेवी	३९२६.७३	४९४३.३५	८.८४ %
मुदत ठेवी	३३४२३.२२	३७४१२.२४	६६.९५ %
एकुण ठेवी	**४८७२१.३०**	**५५८८३.०२**	**१०० %**

निधी गुंतवणुक :

बँकेस उत्पन्न मिळवून देणारा मुख्य घटक हा कर्जवाटप व गुंतवणुक असतो कर्जवाटपाचे प्रमाण (CD Ratio) कमी राहिल्यास अधिक रक्कम गुंतवणुकीसाठी उपलब्ध असते बँकेची दि. ३१/३/२०२६ अखेर सरकारी रोखे व अन्य गुंतवणूक ₹ ३०५.१४ कोटी आहे. इतर बँकातील मुदत ठेवी ₹ ७६.२८ कोटी व करंट खात्यामध्ये ₹ १९.२० कोटी गुंतवणूक आहे. सरकारी कर्जरोख्यातील एकूण गुंतणूक ₹ २१८.९१ कोटी आहे.

या पैकी बुक व्हॅल्यू नुसार HTM मध्ये ₹ १००.६५ कोटीची गुंतवणूक आहे. AFS मध्ये एकूण ₹ ११८.२६ कोटी ची गुंतवणूक आहे. AFS मधील सरकारी कर्जरोख्याची फेस व्हॅल्यू ₹ ११५.८४ कोटी असून मार्केट व्हॅल्यू ₹ १०३.९३ कोटी आहे.

बँकेची गुंतवणुक प्रामुख्याने केंद्र/राज्य शासनाचे कर्जरोखे, पुणे जिल्हा मध्य. सह. बँक मर्या., आय. डी. बी. आय. बँक, टी. जे. एस. बी. बँक, आय. डी. एफ. सी. बँक, एच. डी. एफ. सी. बँक, एस.व्हि.सी. बँक, आय. सी. आय. सी. आय. बँक, डी.सी.बी. बँक, सारस्वत बँक,रत्नाकर बँक, इक्विटास बँक, बंधन बँक, जना स्मॉल फायनान्स, विश्वेश्वर सहकारी बँक,सुर्योदय स्मॉल फायनान्स, उज्जीवन स्मॉल फायनान्स, इंडसइंड बँक या बँकांचे ठेवीमध्ये केली आहे. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार सी. आर. आर. ,एस. एल. आर. व सरकारी कर्जरोख्यातील गुंतवणुकीचे प्रमाण पाळले आहे. दि. ३१/३/२०२६ अखेर सरकारी कर्ज रोख्यामधील व अन्य नॉन एस.एल.आर. मधील एकूण गुंतवणूक ₹ ३०५.१४ कोटी आहे.

कर्जे :

३१/३/२०२५ अखेर बँकेने एकुण कर्जपुरवठा ₹ २,६८,८०,०७,३५५.३४ केला होता. चालु आर्थिक वर्षामध्ये त्यामध्ये ₹ ५०,३४,९३,७६१.१८ ने वाढ होऊन दि. ३१/३/२०२६ अखेर एकुण कर्जपुरवठा ₹ ३,१९,१५,०१,११६.५२ केला आहे. तो पुढीलप्रमाणे

कर्ज रक्कम	खातेसंख्या	येणे बाकी(₹ लाखात)	एकुण कर्जाची टक्केवारी
₹ १,००,००० पर्यंत	१८८७	१११९.७५	३.५१ %
₹ १,००,००१ ते ५,००,०००	३१२५	८६२७.९०	२७.०३ %
₹ ५,००,००१ ते १०,००,०००	५९५	३९९३.६५	१२.५१ %
₹ १०,००,००१ ते १५,००,०००	२११	१९९५.३९	६.२५ %
₹ १५,००,००१ ते २५,००,०००	२६८	४१०२.०६	१२.८५ %
₹ २५,००,००१ चे पुढे	२६९	१२०७६.२६	३७.८५ %
एकूण	**६३५५**	**३१९१५.०१**	**१०० %**

₹ २५ लाखापर्यंतच्या कर्जदारांची संख्या ६०८६ आहे व त्याचे प्रमाण ६२.१२% आहे यावरून बँक लहान कर्जदारांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करते हे आपल्या लक्षात येईल. बँकेने एकुण कर्जपुरवठ्याच्या ६४.१७ % कर्जे अग्रक्रम क्षेत्राला व १६.८०% दुर्बल घटकाला, मायक्रो एंटरप्रायझेस क्षेत्रास २०.०३% एवढा कर्ज पुरवठा केला आहे. बँकेच्या एकुण कर्जापैकी १२.५९ % एवढेच कर्ज हे विनातारण असून ८७.४१ % कर्ज हे तारणी स्वरुपाचे आहे.

थकबाकी :

अहवाल वर्षामध्ये एकूण कर्ज ₹ ३,१९,१५,०१,११६.५२ असून त्यापैकी थकबाकी ₹ ११,५३,१५,७५४.६० इतकी आहे. थकबाकीचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण ३.६१ % इतके आहे. थकीत कर्जदाराविरुद्ध वसुलीबाबत चालू असलेल्या कार्यवाहीची माहिती खालीलप्रमाणे.

तपशील	संख्या	₹ लाखात येणे रक्कम
ऑर्डिनरी नोटीस पाठविलेली प्रकरणे	३९८	२३२५.१३
कलम १०१ अन्वये दावा दाखल केलेली एकूण प्रकरणे	३१	१५४.४०
त्यापैकी कलम १०१ अन्वये अॅवॉर्ड मिळालेली प्रकरणे	२४	१३७.०८
त्यापैकी १०१ अन्वये अॅवॉर्ड न मिळालेले प्रकरणे	०७	१७.३२
अॅवॉर्ड मिळून कार्यवाही सुरु असलेली प्रकरणे	१०४	९८२.४८
कलम १३८ अन्वये कारवाई केलेली प्रकरणे	०	०

सर्व संचालकांनी व सर्व सेवकांनी अथक प्रयत्न करुन एन.पी.ए. व थकीत खात्यांची लक्षणीय वसुली केली त्यामुळे दि. ३१ मार्च २०२६ रोजी ग्रॉस एन. पी. ए. १.६६% व नेट एन.पी.ए. ० % राखण्यात बँकेने यश मिळविले आहे.

नियमित कर्ज हप्ते भरल्यास कर्जदारांना व्याजदरावर १% सूट (रिबेट) दिली जाते. दि. १ /९/२०२१ पासून व्याजदर कमी केल्याने या तारखेनंतर मंजूर झालेल्या नविन कर्जासाठी रिबेट योजना बंद केलेली आहे. दि. ३१/८/२०२१ पुर्वीच्या चालू कर्ज खात्यांना त्या कर्जाची मुदत संपेपर्यंत अथवा मा. संचालक मंडळाचे पुढील निर्णय होईपर्यंत रिबेट मिळेल वर्ष २०२५ -२६ या आर्थिक वर्षात एकुण २३ कर्जदार सभासदांना त्याचा लाभ मिळाला. रिबेट पोटी ₹ २,८८,५२३.०० एवढी रक्कम कर्जदारांचे कर्जखात्यावर जमा केली आहे.

नफा वाटणी :

बँकेचा दिनांक ३१/०३/२०२६ अखेर निव्वळ नफा ₹ ७,३२,७९,५२६.०२ व मागील वर्षीचा शिल्लक नफा ₹ १,९४८.३० आहे. २०२५-२०२६ या वर्षाअखेर झालेल्या एकूण नफ्याची विभागणी संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार करीत आहोत त्यास सर्वसाधारण सभेने मान्यता द्यावी.

(रुपये प्रत्यक्ष)

सन २०२४-२०२५ चा शिल्लक नफा	१,९४८.३०	राखीव निधी (किमान ३५%)	२,५७,००,०००.००
सन २०२५-२०२६ चा चालू नफा	७,३२,७९,५२६.०२	लाभांश (११%)	१,४७,८०,५१५.००
		गुंतवणूक चढ उतार निधी	२७,९९,०००.००
		सभासद कल्याण निधी	१०,००,०००.००
		सेवक कल्याण निधी	१०,००,०००.००
		इमारत निधी	१,७०,००,०००.००
		संचालक व स्टाफ प्रशिक्षण निधी	१०,००,०००.००
		बँक डेव्हलपमेंट फंड	१,००,००,०००.००
		पुढील वर्षासाठी शिल्लक नफा	१,९५९.३२
एकूण	**७,३२,८१,४७४.३२**	**एकूण**	**७,३२,८१,४७४.३२**

लाभांश :

स्थापनेपासून बँकेने सभासदांना नियमित लाभांश दिला आहे. मागील वर्षी बँकेने सभासदांना ११% दराने लाभांश दिला आहे. बँकेचा आर्थिक पाया अधिक मजबूत असावा, स्वनिधी मध्ये वाढ व्हावी व सभासदांना देखील मुदत ठेवी मध्ये असलेल्या व्याजदरापेक्षा ३ ते ४ टक्के दराने अधिकचा लाभ देण्यात यावा या हेतूने या वर्षी सभासदांना ११% दराने लाभांश वाटपास संचालक मंडळाची शिफारस आहे.

ठेव विमा योजना :

आपल्या ठेवीदाराच्या हितरक्षणाविषयी बँक नेहमीच जागरुक असते म्हणुनच अहवाल वर्षामध्ये डी.आय.सी.जी.सी. कायदा १९६१ च्या कलम १५ अन्वये ठेवीच्या विम्याचा सप्टेंबर २०२५ अखेरच्या सहामाहीचा ₹ ३४,५८,८२२/- चा प्रिमियम दि. १७/०५/२०२५ रोजी व मार्च २०२६ अखेरच्या सहामाहीचा ₹ ३७,४३,७८६/- चा प्रिमियम दि.३१/१०/२०२५ रोजी डी.आय.सी.जी.सी. कडे जमा करण्यात आला आहे.

सर्व सभासदांना व ठेवीदारांना कळविण्यात येते की यापुढे ₹ ५ लाखापर्यंतच्या ठेव रक्कमेस डि.आय.सी.जी.सी. चे विमा संरक्षण उपलब्ध झाले आहे.

नक्त मुल्य (Net Worth) :

बँकेचे गतवर्षी नक्त मुल्य ₹ ५१.३४ कोटी होते. दि. ३१ मार्च २०२६ अखेर आपल्या बँकेचे नक्त मुल्य ₹ ५६.५६ कोटी इतके आहे. संचालक मंडळ नक्त मुल्य वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. वाढीव नक्त मुल्यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडून आपणांस ग्राहकांसाठी ज्यादा सेवा देण्यासाठी मान्यता / शिथिलता मिळते.

आर.टी.जी.एस. व एन. ई. एफ.टी. (RTGS/NEFT) :

आपल्या बँकेने एच.डी.एफ.सी. बँकेमार्फत आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. (RTGS/NEFT) सुविधा खातेदासांसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचा सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार व इतर ग्राहकांनी लाभ घ्यावा.

आय.एफ.एस. कोड (IFS Code) :

आपल्या बँकेच्या सर्व शाखांसाठी आय. एफ.एस. कोड (IFS Code) सुविधा असून खातेदारांनी आर.टी.जी.एस./एन.एफ.ई.टी. द्वारे रक्कम ग्राहकांच्या खात्यामध्ये हस्तांतर करता येईल. शाखांना आय.एफ.एस. कोड दिलेला आहे त्यामार्फत ठेवीदार, खातेदार, सभासद व इतर ग्राहकांना रक्कम हस्तांतर करता येईल. त्यादृष्टीने शाखांना सूचना देऊन शाखांचा आय.एफ.एस. कोड नोटीस बोर्डावर माहितीकरीता लावलेला आहे. तरी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ खातेदारांनी घ्यावा.

डॉर्मट खाते (Dormant Account) :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार सतत २ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये बचत व चालू खात्यावर कोणत्याही प्रकारचा व्यवहार झाला नसेल तर ते खाते डॉर्मट खाते म्हणून त्याची वर्गवारी केली जाते. सदरील खाते पूर्ववत सुरु करण्यासाठी सबंधीत शाखेत जाऊन के.वाय.सी. चे निकष पूर्ण करुन खात्यावर नियमित व्यवहार करणे आवश्यक आहे.

ठेवीदार, शिक्षण व जागरुकता निधी (DEAF) :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार सतत १० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी व्यवहार न झालेली बचत ठेव खाती, चालू ठेव खाती, मुदत ठेवी व इतर देणे अशा खात्यामधील शिल्लक रक्कम रिझर्व्ह बँकेच्या डी.ई.ए.एफ. (DEAF) खात्यामध्ये जमा करण्यात येतात. तरी सभासद, ठेवीदार, खातेदार व ग्राहकांनी याबाबत नोंद घ्यावी. त्यासाठी खातेदारांनी के.वाय.सी. चे निकष पूर्ण करुन खात्यावर नियमित व्यवहार सुरु करावेत.

व्यवसाय अधिकृततेसाठी पात्रता निकष (ECBA) :

आपल्या बँकेने रिझर्व बँक ऑफ इंडियाचे परिपत्रक क्र. RBI/DOR2025-26/271, DOR.LIC.REC.No. 330/07.01.000/2025-26 Dt. 04 th Dec. 2025 अन्वये व्यवसाय अधिकृततेसाठी पात्रता (Eligibility Critaria for Business Authorization) निकषांची पूर्तता केलेली आहे हे आवर्जुन या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

के. वाय. सी. नॉर्मची पूर्तता करणेबाबत (K.Y.C.) :

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशनानुसार जुन्या व नवीन सर्व खातेदारांना के.वाय.सी. नॉर्मची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व खातेदारांना सूचित करण्यात येते की आपले ज्या शाखेत खाते आहे त्या शाखेतील शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधून आपल्या खात्यांची के.वाय.सी. निकषांची पूर्तता लवकर करुन घेऊन खात्यावर नियमित व्यवहार करणे आवश्यक आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडून तपासणी :

बँकेची दि. ३१/०३/२०२५ अखेर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया विभागीय कार्यालय, मुंबई यांचेकडून तपासणी झालेली आहे. सदर तपासणी अहवाल बँकेस प्राप्त झालेला असून सदर अहवालातील दोषांची पूर्तता करुन त्यांचा दोष दुरुस्ती अहवाल Daksh Portal मार्फत रिझर्व्ह बँक ऑफ

इंडियाकडे मुदतीत पाठविला आहे.

शाखा विस्तार :

बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. दि. ३१/०३/२०२६ अखेर बँकेच्या मुख्य कार्यालयासह एकूण १५ शाखा कार्यरत आहेत. लवकरच नियोजित दोन शाखा उघडण्याचा संचालक मंडळाचा मनोदय आहे. त्यादृष्टीने संचालक मंडळ प्रयत्नशील आहे.

सेवक :

सेवकांच्या ग्रुप ग्रॅच्युईटी पोटी दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर एकूण रक्कम ₹ १,४७,२६,९४८.४४ एवढी व सेवकांच्या लिव्ह एन कॅशमेंट पोटी एकूण रक्कम ₹ ३६,८७,८०७.१३ एवढी रक्कम एल. आय. सी. कडे वेळोवेळी जमा केलेली शिल्लक आहे.

बँकेने सेवकांचा वेतन करार केला असून वेतन करारात काही फिक्स व काही व्यवसाय वाढीचे प्रमाणात प्रोत्साहन भत्ता दिला आहे. तसेच शाखांना त्यांचे वैयक्तिक उद्दीष्ट पूर्ण केल्यास त्यांना स्वतंत्र शाखा व्यवसाय वाढ भत्ता सुरु केला आहे. याचा या स्पर्धात्मक युगात बँकेला निश्चितच फायदा होईल.

सेवक रचना :–

बँकेची गेल्या ३ वर्षातील आर्थिक परिस्थिती व सेवक संख्या कायमच सहकार खात्याच्या मापदंडाप्रमाणे राहिली आहे

(₹ लाखात)

अ.क्र	तपशील	३१/०३/२०२५	३१/०३/२०२६	अपेक्षित
१	व्यवसाय	७५६०१.३७	८७७९८.०३	
२.	नफा	६९७.०९	७३२.८१	
३.	प्रति कर्मचारी उत्पादकता	४८४.६२	५५९.२२	किमान ३७५
४	प्रति कर्मचारी नफा	४.४७	४.६७	किमान २ पेक्षा

दि. ३१/०३/२०२६ रोजी बँकेत अस्तित्वात असलेली पदे : **अधिकारी : ६२ क्लार्क : ५६ ड्रायव्हर / शिपाई : २१ हंगामी १८ एकूण : १५७** वरील आकडेवारीचा विचार करता सध्याची पदे व्यवसायापेक्षा कमी आहेत. या वर्षी एकूण ३४ जादा पदे (अधिकारी १०, क्लार्क २०, शिपाई ०४) भरावयाची आहेत. मुख्य कार्यालय व शाखांच्या गरजेनुसार व पात्र उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार ही पदे भरली जातील.

प्रशिक्षण

बँकेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी सेवक वर्ग प्रशिक्षित असणे जरुरीचे आहे हे ओळखून बँकेने निरनिराळ्या संस्थांमध्ये सेवकांना प्रशिक्षणासाठी पाठविले होते. तसेच बँकेने अंतर्गत प्रशिक्षण विभागातर्फे निरनिराळ्या विषयांवर सेवकांना अंतर्गत प्रशिक्षण दिले आहे बँकिंग क्षेत्रातील अद्ययावत घडामोडींची माहिती असावी यासाठी संचालकांनी निरनिराळ्या प्रकारच्या परिसंवादांना, चर्चासत्रांना उपस्थिती लावली. यामध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्था, आय. आय. बी. एफ., मुंबई, विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंधक संस्था या संस्थांमधून इन्व्हेस्टमेंट, मार्केटिंग, संघटन कौशल्य, कर्ज व वसुली, सायबर क्राईम या विषयावर प्रशिक्षण व परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. बँकेतील अधिकाधिक सेवकांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण अहवाल वर्षात देण्यात आले. तसेच महिन्यातून किमान १ वेळा सेवकांना बँकेच्या प्रशिक्षकांमार्फत अंतर्गत प्रशिक्षण दिले जाते.

भांडवल पर्याप्तता :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने बँकांची आर्थिक परिस्थिती सुधारावी व सहकारी बँका स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्यात यासाठी भांडवल पर्याप्तता प्रमाण किमान १२ % ठरवले व यानुसार सक्षम बँकेचा मापदंड ठरविण्यात आला. दि. ३१/३/२०२६ रोजी आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १९.९६% झाले आहे.

लेखापरिक्षण :

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार संचालक मंडळाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता शाखांच्या व मुख्य कार्यालयातील निरनिराळ्या लेखापरिक्षणाकरीता पुढील प्रमाणे लेखापरिक्षकांची नियुक्ती केली होती. मे. देशपांडे ॲण्ड मेंडेस चार्टर्ड अकौंटंट - स्टॅट्युटरी ऑडीट, मे. ए. एम. आवटी ॲण्ड असोसिएटस् - टॅक्स ऑडिट, तसेच बँकेच्या शाखांतील समावर्ती लेखापरिक्षणासाठी वेगवेगळ्या सी.ए. फर्मची नियुक्ती केली होती. शिवाय बँकेच्या ऑडीट इन्स्पेक्शन विभागातील अधिकारी स्वतंत्रपणे ऑडिट करत आहेत. सर्व शाखा व मुख्य कार्यालय येथील कामकाज व व्यवहाराची दरमहा तपासणी केली जात आहे. दरमहा व सातत्याने लेखापरिक्षण होत असल्याने कामकाजावर नियंत्रण तसेच त्रुटींची दुरुस्ती करुन घेणे, चुकांची पुनरावृत्ती टाळणे या बाबी शक्य झाल्या आहेत. त्यामुळे शाखांचे दैनंदिन कामकाजाचा दर्जा सुधारण्यामध्ये चांगलाच हातभार लागत आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत रिझर्व्ह बँकेची प्रत्यक्ष तपासणी झाली आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मे. देशपांडे ॲण्ड मेंडेस चार्टर्ड अकौंटंट यांची वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक केली होती. त्यांनी बँकेच्या व्यवहाराची आणि हिशोबाची तपासणी करुन बँकेस **'अ'** वर्ग दिला आहे. हिशोब तपासणी काळात त्यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाचा बँकेस फायदा झाला आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरूस्ती :

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे शासकिय लेखापरिक्षण मे.देशपांडे ॲण्ड मेंडेस (एफआरएन १३८१४७ डब्ल्यू)चार्टर्ड अकौंटंट यांनी केले असून त्यांचे भागीदार सी.अर्विन मेंडेस.रजिस्टर नं. एम.एन. १५०७१६ यांनी लेखापरीक्षण अहवालावर सही केली आहे. मे. देशपांडे ॲण्ड मेंडेस यांनी लेखापरिक्षण अहवाल दि.२५/०६/२०२५ रोजी मुख्य कार्यालयाला सादर केलेला आहे. बँकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ चा दोष दुरूस्ती अहवाल तयार करून संचालक मंडळ सभेत सादर केला व त्याची नोंद घेऊन सदर अहवाल सहकार खात्यास सादर करण्यास संचालक मंडळ सभेची मान्यता घेण्यात आली. बँकेने दोष दुरूस्ती अहवाल मे. देशपांडे ॲण्ड मेंडेस चार्टर्ड अकौंटंट यांना दि. २२/९/२०२५रोजी पाठवला आहे. सदर अहवालाची एक प्रत मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना तसेच एक प्रत जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-सहकारी संस्था पुणे यांना दि.२३.०९.२०२५ रोजी पाठवली आहे.

२०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता नेमणुक केलेल्या अंतर्गत व कंकरंट लेखापरिक्षकांची नियुक्ती व मानधन :

१. **सुजित बिराजदार ॲन्ड असो.**: मुख्य कार्यालय इनव्हेस्टमेंट व एनपीए त्रैमासिक ऑडिट - वार्षिक मानधन रू.८०,०००/-

२. **मे. अकम ॲन्ड कंपनी** : वार्षिक टॅक्स ऑडिट - वार्षिक मानधन रू.४६,०००/-

३. **Sec My IT इन्फोसेक सोल्यूशन प्रा.लि.**:सिस्टिम ऑडिट व व्हीएपीटी ऑडिट-वार्षिक मानधन प्रत्येकी रू.१,३५,०००/- व रू.७०,०००/-

४. **मे. सुजीत बिराजदार ॲन्ड असो.**: जीएसटी कन्सल्टन्सी-वार्षिक मानधन रू.७२,०००/-

५. **मे. ए.एस.देव ॲन्ड कं.**: थेरगांव शाखा, चिखली शाखा व कात्रज शाखा त्रैमासिक ऑडिट - वार्षिक मानधन प्रत्येकी रू.६५,०००/-, रु. ४५,०००/- व रु. १६,५००/-

६. **मे. अक्षय बाहेती ॲन्ड कं.**: चाकण शाखा, काळेवाडी शाखा, निगडी शाखा त्रैमासिक ऑडिट - वार्षिक मानधन प्रत्येकी रू.३३,०००/- + रु. २,००० (प्रवास भत्ता), रु. १६,५००/- व १६,५००/-

७. **मे. सतीश मुंदडा ॲन्ड असो.**: आळंदी शाखा व भोसरी शाखा त्रैमासिक ऑडिट - वार्षिक मानधन प्रत्येकी रू.३३,०००/- + रु. २,००० (प्रवास भत्ता) रु. २६,०००/-

८. **मे. ए.एस.के.वाय ॲन्ड कं.**: रावेत शाखा, सांगवी शाखा व पिंपळे निलख शाखा त्रैमासिक ऑडिट - वार्षिक मानधन रूपये २६,०००/-, रु. १६,०००/- व रु. १६,५००/-

९. **मे. नरेंद्र केसकर ॲन्ड कं.:** नसरापूर शाखा, वडगाव धायरी शाखा, कासार अंबोली शाखा, त्रैमासिक ऑडिट – वार्षिक मानधन रूपये २६,०००/– अधिक प्रवासभत्ता रु. २०००/– + रु. १६,५००/–+ रु. १३,५००/– अधिक प्रवासभत्ता रु. २०००/–

१०. **मे. मेहता जोशी ॲन्ड कं.:** पेरणे फाटा शाखा त्रैमासिक ऑडिट – वार्षिक मानधन रूपये १६,५००/– अधिक प्रवासभत्ता रु. २०००/–

११. **राहूल वाढवणे ॲन्ड कं.:** स्टॉक ऑडिट – कॅश क्रेडिट खाते वार्षिक मानधन पुण्याबाहेर जावे लागल्यास प्रत्यक्षात येणारा खर्च., कॅश क्रेडिट कर्ज खाते रु. ३,०००/–

१२ **मे. ए.एस.देव ॲन्ड कं.:** कस्टमर सर्व्हिस ऑडिट वार्षिक मानधन प्रति शाखा रु. २,०००/–

वरीलप्रमाणे चालू आर्थिक वर्षासाठी वेगवेगळ्या ऑडिटसाठी ऑडिटर्स यांच्या नियुक्ती व मानधन यांच्या शिफारसीस मान्यता मिळावी.

२०२६–२०२७ या आर्थिक वर्षाकरिता नेमणूक केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती :

सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने संचालक मंडळास दिलेल्या अधिकारानुसार व सुचनां नुसार २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी बँकेचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे संगारे कुलकर्णी ॲन्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंट यांची नेमणूक करणेस संचालक मंडळाने शिफारस केलेली आहे त्यास सर्वसाधारण सभेने मंजुरी द्यावी.

संगणकीकरण :

बँकेने Core Banking Solution सुरु केले असून स्वतःचे डाटा सेंटर उभारले आहे. बँकेतर्फे RTGS,NEFT सुविधा दिली जाते तसेच ग्राहकांसाठी SMS अलर्ट सुविधा उपलब्ध केली आहे. त्याचप्रमाणे बँकेच्या कोणत्याही शाखेतून पैसे काढता/भरता येतील अशी Any Where Banking ची सुविधा व इन्कमटॅक्स व जी.एस.टी. भरण्याची सुविधा सुरु केली आहे. CBS मुळे बँकेच्या प्रगतीला मोठा हातभार मिळाला आहे.

भारत सरकारला अपेक्षित Digital क्रांतीचा फायदा बँकेतील व्यावसायिक खातेदारांना व्हावा यासाठी बँकेने व्यावसायिक खातेदारांना POS मार्फत ग्राहकांकडून ATM/Debit कार्डद्वारे बिलांची रक्कम स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच आपल्या बँकेद्वारे UPI सुविधाही उपलब्ध करुन दिली आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. बँकेच्या व्यावसायिक खातेदारांसाठी QR Code ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. व्यावसायिक खातेदारांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. बँकेची DR SITE ESDS या कंपनीकडे नाशिक येथे को – लोकेशन तत्वावर कार्यरत आहे.

बँकेने IMPS द्वारा फंडस् ट्रान्सफर सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. बँकेचे नविन Mobile Banking App. हे गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध केले आहे ते डाऊनलोड करुन त्याचा सर्व सभासदांनी फायदा घ्यावा अशी बँकेतर्फे विनंती करण्यात येत आहे.

ए. टी. एम. सुविधा :

बँकेने एकूण १५ शाखांपैकी १३ शाखांमध्ये ए.टी.एम. मशीन बसविलेली असून एकूण १३१४० खातेदारांना ए.टी.एम. कार्ड देण्यात आली आहेत. आपल्या बँकेची ए.टी.एम. मशीन मोक्याच्या ठिकाणी असल्याने त्याचा वापर अन्य बँकांचे खातेदार जादा प्रमाणावर करतात यामुळे बँकेस उत्पन्न मिळते. बँकेने आळंदी शाखेतही ए. टी. एम. सुविधा सुरु केली आहे तसेच यापुढे नविन उघडली जाणारी शाखा ए.टी.एम. समवेत उघडली जातील असा बँकेचा प्रयत्न राहील. बँकेने ए.टी.एम. इन्स्टा कार्ड सुविधा सुरु केली असल्याने ग्राहकांना त्वरीत ए.टी.एम. कार्ड उपलब्ध होत आहे.

आधार कार्ड लिंकेज सुविधा / सामाजिक सुयोजना :

बँकेमध्ये खातेदारांच्या आधार कार्ड क्रमांकाशी त्यांचे खाते संलग्न करण्याची ऐच्छिक योजना कार्यान्वित केली असून त्यामुळे सरकारकडून मिळणारे गॅस अनुदान, रॉकेल अनुदान, शिष्यवृत्ती, पेन्शन योजनांच्या रक्कमा खातेदारांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

भारताच्या पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या सामाजिक सुरक्षा योजनांपैकी मे. ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या सहयोगाने प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशनच्या सहयोगाने प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना बँकेमध्ये सुरुवातीपासून कार्यान्वित आहेत. या योजने

अंतर्गत रु. ४३६/- वार्षिक हप्ता भरल्यास एल.आय. सी. द्वारा रु. २ लाखाचा विमा उतरविला जातो. तसेच रु. २०/- वार्षिक हप्ता भरल्यास रु. २ लाखाचे अपघाती विमा संरक्षण ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीतर्फे दिले जाते.सभासदांना कळकळीचे आवाहन आहे की त्यांनी बँकेतील सेव्हिंग खात्यामधून हे हप्ते दरवर्षी पाठविण्याची सूचना बँकेला द्यावी व विमा संरक्षण मिळवावे.

व्यवस्थापन मंडळ

सहकारी बँकांवर नियंत्रण असावे व बँकांचे कामकाज व्यावसायिक व पारदर्शी व्हावे या हेतूने रिझर्व्ह बँकेने कायदेशीर तरतुदीनुसार निरनिराळ्या मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. या सर्व सुचनांचे पालन आपली बँक कसोशिने करत आहे.

या नुसारच बँकेने व्यवस्थापन मंडळाची स्थापना केली आहे व या व्यवस्थापन मंडळाच्या नियमित सभा सुरु झालेल्या आहेत . या मंडळाचे बँकेच्या सध्याच्या संचालकां पैकी सहकार व निरनिराळ्या क्षेत्रातील अनुभवी ३ संचालक व बाहेरील ३ व्यावसायिक व्यक्ती आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असे एकूण ७ सदस्य आहेत. व्यवस्थापन मंडळाचे मार्गदर्शन व शिफारशीनुसार बँक अधिक चांगल्या पध्दतीने कामकाज करीत आहे.

आगामी काळातील वाटचाल

केंद्र सरकारने सहकारी बँकांच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व बँकेचा कारभार अधिक व्यावसायिक व सुनियोजित होण्याच्या हेतूने काही बदल केले आहेत व सहकारी बँकांचे कामकाज अन्य बँकांच्या प्रमाणे करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये बोर्ड ऑफ मॅनेजमेंटची स्थापना, संचालकांच्या पात्रतेचे निकष तसेच सी.ई.ओ. यांच्या नेमणुकीचे निकष, रिस्क बेस ऑडिट व कर्ज वितरणासाठी निरनिराळी उद्दिष्टे या सर्वांचा समावेश आहे. आपल्या बँकेला या सर्व बाबींचे पालन करत व्यवसाय वाढ व कर्ज वाटप करावे लागणार आहे. केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार खात्याची स्थापना केलेली आहे. त्याद्वारे संपूर्ण देशाच्या सहकार क्षेत्राची भरभराटच होईल असा विश्वास वाटतो. आपल्या सर्व सभासदांच्या पाठिंब्यावर आपली बँक आगामी काळात सुध्दा मागील प्रमाणेच उत्कृष्ट कामगिरी करेल अशी अपेक्षा आहे.

बँकेने ग्राहकांना तत्पर व चांगली संगणकीय सुविधा देण्यासाठी बँकिंग सॉफ्टवेअर बदलण्याचा निर्णय घेतलेला आहे. याबाबत लवकरात लवकर पूर्तता करण्यात येणार आहे.

बँकेने युपीआय, एटीएम, मोबाईल बँकिंग या सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. हे व्यवहार करत असताना ग्राहकांचे आर्थिक व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी सायबर सुरक्षा संदर्भातील सर्व सॉफ्टवेअर खरेदी केले असून ते कार्यान्वित करण्यात आले आहेत.

अभिनंदन :

अहवाल वर्षामध्ये थेरगांव, चिखली, चाकण, आळंदी, नसरापूर, पेरणे फाटा, निगडी, भोसरी, रावेत व सांगवी या शाखांनी ठेवींचे व थेरगांव, चिखली, चाकण, आळंदी, नसरापूर, पेरणे फाटा, निगडी व कासार-अंबोली या शाखांनी कर्जाचे उद्दिष्टे पूर्ण केले आहे. या शाखांमधील सर्व सेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन !

श्रद्धांजली :

अहवाल काळात भारतातील जे ज्ञात, अज्ञात थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यिक , कलावंत, जवान ,शिक्षण तज्ञ, देशभक्त, कवी, सामाजिक कार्यकर्ते, बँकेचे ठेवीदार, सभासद, हितचिंतक तसेच संचालकांचे, सेवक व सेवकांचे नातेवाईक दिवंगत झाले त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना ! त्यांच्या पवित्र स्मृतीस ही सभा भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

समारोप :

आपण सर्वांनी दाखविलेला विश्वास, केलेले सहकार्य व दिलेला उदंड प्रतिसाद यांचा बँकेच्या यशाच्या वाटचालीमध्ये महत्त्वाचा वाटा आहे. असेच सहकार्य यापुढेही मिळत राहील याची खात्री आहे. आपणा सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे पदाधिकारी यांचेकडून वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले असून त्यांचे आम्ही मन:पूर्वक आभारी आहोत. बँकेचे दैनंदिन व्यवहार तसेच बँकिंग व प्रशासकिय अडचणीमध्ये मार्गदर्शन करणे, सेवकांना प्रशिक्षण देणे, या कामांमध्ये पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन सहकार्य करत आहे त्याबद्दल त्यांचे आभार. मा. जिल्हा उपनिबंधक (शहरविभाग) व त्यांचे सहकारी यांचे वेळोवेळी बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. बँकेचे अंतर्गत लेखापरिक्षक, वैधानिक लेखापरिक्षक यांनी बहुमोल मार्गदर्शन व सुचना केल्या त्यांचे मन:पूर्वक आभार. बँकेचे अधिकृत सराफ, कायदा सल्लागार, व्हॅल्युअर व सर्व शाखांचे जागा मालक यांचे सहकार्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो.

मा. ना. श्रीमती सुनेत्रा पवार – उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. आमदार श्री. दिलीप वळसे पाटील, केंद्रिय राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर मोहोळ, खासदार मा. सौ. सुप्रियाताई सुळे, खासदार मा. श्री. श्रीरंगअप्पा बारणे, खासदार मा. श्री. अमोल कोल्हे, मा. श्री. आण्णा बनसोडे – विधानसभा उपाध्यक्ष, आमदार मा. श्री. शंकरभाऊ जगताप, आमदार मा. श्री. महेशदादा लांडगे, आमदार मा. श्री. बाबाजी काळे, आमदार मा. श्री. भिमराव तापकीर, आमदार मा. श्री. शंकरभाऊ मांडेकर, आमदार मा. श्री. सुनिल अण्णा शेळके तसेच विविध क्षेत्रात काम करणारे अधिकारी, पदाधिकारी यांचे वेळोवेळी सहकार्य लाभत असते. तसेच बँकेचे कामकाज सुरळीत चालविणे करिता संचालक मंडळातील माझे सर्व सहकारी व बँकेचा सेवक वर्ग यांचे उत्तम सहकार्य मिळाले त्याबद्दल त्यांचेही मी मन:पुर्वक आभार मानतो.

पुन:श्च एकदा आपणा सर्व सभासदांचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त करतो व हा अहवाल सादर करतो, धन्यवाद !

आपला नम्र

मा. श्री. कांतीलाल तुकारामभाऊ गुजर

चेअरमन



सभासदांना आग्रहांचे निमंत्रण

सन २०२५-२६ या वर्षामध्ये ज्या सभासदांनी वयाची साठ वर्षे (६० वर्षे) किंवा चौऱ्याहत्तर वर्षे (७४ वर्षे) पूर्ण केलेली आहेत अशा सर्व

सभासदांना आग्रहाचे निमंत्रण

दरवर्षी आपण बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर अहवाल कालावधीत ६० वर्ष पूर्ण व ७४ वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा गौरव करत असतो चालू वर्षी आपण २०२५-२६ या कालावधीतील गौरवांस पात्र सभासदांचे सन्मान करणार आहोत. आपल्या सहकार्या बद्दल धन्यवाद.

ज्या सभासदांनी दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/३/२०२६ या वर्षात वयाची (६० वर्षे) पूर्ण करून ६१ व्या वर्षात पदार्पण केले असेल त्यांना प्रेरणा जीवन गौरव पुरस्कार तसेच दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ याच कालावधी मध्ये वय वर्षे चौऱ्याहत्तर (७४ वर्षे)पूर्ण झालेल्या सर्व ज्येष्ठ सभासदांना त्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवा निमित्त अमृत महोत्सवी मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रम प्रेरणा को-ऑप. बँकेची बुधवार दि. ०९/०९/२०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रा. रामकृष्ण मोरे, प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे ४११०३३ येथे आयोजित केलेली २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाल्यानंतर होणार आहे. आपण आजपर्यंत केलेल्या सहकार्य, प्रेम आणि मार्गदर्शनाबद्दल आम्ही आपला सन्मान करू इच्छितो व आपणाप्रती कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो.

तरी सर्व पात्र सभासदांना विनंती की, त्यांनी दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत आपली माहीती बँकेच्या नजीकच्या शाखेत प्रत्यक्ष किंवा ७७२१९००९०० या क्रमांकावर द्यावी व आपला गौरव करण्याचे सदभाग्य आम्हास द्यावे.

आपला नम्र

मा. श्री. कांतीलाल तुकारामभाऊ गुजर (चेअरमन)

जागृत रहा..! सावध रहा..!



- एटीएम कार्ड क्रमांक, CVV क्रमांक, ओटीपी, युपीआय पिनची विचारणा बँक खातेदाराला कधीच करत नाही.
- पैसे काढण्यासाठी स्वतःचे एटीएम कार्ड कोणालाही देऊ नका. एटीएम कार्डवर पिन क्रमांक कधीही लिहू नका.तसेच पिन क्रमांक कोणालाही सांगू नका.
- मोबाईल बँकींग अथवा युपीआय व्दारे पैसे प्राप्त करण्यासाठी पिनची आवश्यकता नाही.
- खातेदाराने बँक खाते लॉगिन आयडी, पासवर्ड, पिन क्रमांक, CVV किंवा ओटीपी कोणालाही सांगू नये. तसेच सोशल मिडीयावर व्यक्तिगत किंवा बँकेच्या संबंधीत कोणतीही माहिती कधीही देऊ नका.
- तुमच्या बँक खात्याबरोबर दगाफटका होण्याची जोखीम वाढू नये याकरीता अज्ञात व्यक्ती किंवा संस्थेकडून येणारे मेसेज मधील लिंक/ई-मेल न उघडता तात्काळ डिलिट करा.
- बँकेने दिलेल्या सुचने प्रमाणेच खात्याचा पासवर्ड सेट करा व तुमच्या खात्याचा पासवर्ड नियमीत बदला.
- कर्जाऊ रक्कम देणाऱ्या अनधिकृत डिजिटल ॲप्स व फसव्या लॉटरी योजना यांच्या पासून सावध रहा.
- बक्षीस रक्कम, सरकारी मदत, KYC अपडेट ऑफर करणाऱ्या आश्वासक संदेशांना कधीही प्रतिसाद देऊ नका.
- तुमच्या फोन/डिव्हाईसवर कोणतेही अज्ञात ॲप डाऊनलोड करू नका.
- सार्वजनिक ठिकाणचे किंवा कुठलेही असुरक्षित वाय-फाय नेटवर्क वापरणे टाळा.
- जर एखादी वेबसाईट वित्तीय माहिती मागत असेल तर त्या वेबसाईटचा खरेपणा अगोदर पडताळून घ्या.
- कोणत्याही ॲप व्दारे Shopping करताना बँकेच्या A/c चे Details Save करू नका. तसेच Shopping करताना Branded आणि अधिकृत ॲपचा वापर करा.



Dail 1930 For Online Financial Fraud & Report Any Cybercrime At cybercrime.gov.in



ताळेबंद पत्रक दि. ३१ मार्च २०२६ रोजीचे
Balance Sheet As on 31 March 2026

आकडे ₹ हजारमध्ये
'000'

	CAPITAL & LIABILITIES	भांडवल व देणी	Shedule	31/03/2026 ₹	31/03/2025 ₹
1	Paid up Share Capital	वसुल भागभांडवल	1	1,37,386.18	1,32,170.98
2	Reserves & Surplus	राखीव निधी व इतर निधी	2	8,31,476.12	7,52,197.19
3	Deposits	ठेवी	3	55,88,302.43	48,72,130.35
4	Borrowing	कर्जे	4	--	--
5	Other Liabilities & Provisions	इतर देणी व तरतुदी	5	93,258.16	80,047.54
	Total	एकूण		66,50,422.89	58,36,546.06
	ASSETS	**मालमत्ता व येणी**	**Shedule**	**31/03/2026 ₹**	**31/03/2025 ₹**
1	Cash & Balances With Reserve Bank of India	रोख शिल्लक	6	1,35,335.73	1,48,288.77
2	Balance with Banks and Money at call	बँक बॅलन्स	7	8,54,818.75	8,35,711.06
3	Investments	गुंतवणूक	8	22,88,534.89	20,14,723.66
4	Advances	कर्जे	9	31,91,501.12	26,88,007.35
5	Fixed Assests	स्थावर मालमत्ता	10	38,277.53	38,677.71
6	Other Assests	इतर येणी	11	1,41,954.87	1,11,137.51
	Total	एकूण		66,50,422.89	58,36,546.06
	Contingent Liability	आकस्मिक देणी	12	3,632.81	2,033.62

❊ संचालक मंडळ ❊

श्री. कांतीलाल तुकारामभाऊ गुजर
चेअरमन

श्री. गबाजी भिवाजी वाकडकर
व्हाईस चेअरमन

श्री. तुकारामभाऊ गुजर
संस्थापक/ संचालक

श्री श्रीधर वाल्हेकर
श्री. संतोष मुंगसे
श्री. नंदकिशोर तोष्णीवाल (तज्ञ संचालक)
श्री. राजेंद्र शिरसाठ

श्री. सुरेश पारखी
कु. अक्षय गुजर
ॲड. अजितकुमार जाधव (तज्ञ संचालक)
सौ. सुजाता पारखी

श्री. संजय पठारे
श्री. जगन्नाथ(नाना) शिवले
श्री. राजाराम रंदिल
सौ. चंद्रभागा भिसे

श्री. तानाजी सोनवणे
(मुख्य कार्यकारी अधिकारी – दि. १५/०६/२०२६ पर्यंत)

श्री. किरण बाळकृष्ण शेळके
(मुख्य कार्यकारी अधिकारी – दि. १६/०६/२०२६ पासून)

सुजित बिराजदार ॲण्ड असोसिएट् चार्टर्ड अकौंटंट
(अंतर्गत लेखापरिक्षक)
FRN 137243W, सी. ए. सुजित बिराजदार
एम. एन. नं. १५५९५३
UDIN No. 26155953NLWBPG6819

देशपांडे ॲण्ड मेंडेस चार्टर्ड अकौंटंट
(वैधानिक लेखापरिक्षक)
FRN 138147W **सी. ए. अर्विन मेंडेस**
पार्टनर, एम. एन. १५०७१६
UDIN NO. : 26150716GJMXCV1536

नफा तोटा पत्रक दि. ३१ मार्च २०२६ अखेर

आकडे ₹ हजारमध्ये '000'

Profit And Loss Account For The Year Ended 31 March 2026

	INCOME	उत्पन्न	Shedule	31/03/2026 ₹	31/03/2025 ₹
I	Interest earned	व्याज मिळाले	13	5,08,312.63	4,61,557.23
II	Other income	इतर उत्पन्न	14	57,840.30	46,901.15
	Total	एकूण		5,66,152.93	5,08,458.38
	EXPENDITURE	**खर्च**	**Shedule**	**31/03/2026 ₹**	**31/03/2025 ₹**
	Interest expended	दिलेले व्याज	15	2,88,358.04	2,58,460.42
	Operating expenses	प्रशासकीय खर्च	16	1,72,507.87	1,46,354.83
	Provisions and contingencies	तरतुदी व इतर	17	32,007.50	33,935.70
	Total	एकूण		4,92,873.41	4,38,750.95
III	Profit / Loss	नफा / तोटा			
	Net Profit / Loss (-) for the Year	चालू वर्षाचा नफा		73,279.52	69,707.43
	Profit / Loss (-) brought forward Last Year	मागील वर्षाचा नफा		1.95	1.52
	Total	निव्वळ नफा		73,281.47	69,708.95
IV.	Appropriations				
	Transfer to statutory reserves	राखीव निधी वर्ग		21,984.44	20,912.68
	Transfer to other reserves	इतर निधी वर्ग		37,858.03	35,958.18
	Transfer to Government/Proposed dividend	प्रस्तावित लाभांश		13,437.00	12,836.09
	Balance carried over to balance sheet	शिल्लक नफा ताळेबंदास वर्ग		2.00	2.00

❊ संचालक मंडळ ❊

श्री. कांतीलाल तुकारामभाऊ गुजर
चेअरमन

श्री. गबाजी भिवाजी वाकडकर
व्हाईस चेअरमन

श्री. तुकारामभाऊ गुजर
संस्थापक/ संचालक

श्री श्रीधर वाल्हेकर
श्री. संतोष मुंगसे
श्री. नंदकिशोर तोष्णीवाल (तज्ञ संचालक)
श्री. राजेंद्र शिरसाठ

श्री. सुरेश पारखी
कु. अक्षय गुजर
ॲड. अजितकुमार जाधव (तज्ञ संचालक)
सौ. सुजाता पारखी

श्री. संजय पठारे
श्री. जगन्नाथ(नाना) शिवले
श्री. राजाराम रंदिल
सौ. चंद्रभागा भिसे

श्री. तानाजी सोनवणे
(मुख्य कार्यकारी अधिकारी – दि. १५/०६/२०२६ पर्यंत)

श्री. किरण बाळकृष्ण शेळके
(मुख्य कार्यकारी अधिकारी – दि. १६/०६/२०२६ पासून)

सुजित बिराजदार ॲण्ड असोसिएट् चार्टर्ड अकौंटंट
(अंतर्गत लेखापरिक्षक)
FRN 137243W, सी. ए. सुजित बिराजदार
एम. एन. नं. १५५९५३
UDIN No. 26155953NLWBPG6819

देशपांडे ॲण्ड मेंडेस चार्टर्ड अकौंटंट
(वैधानिक लेखापरिक्षक)
FRN 138147W **सी. ए. अर्विन मेंडेस**
पार्टनर, एम. एन. १५०७१६
UDIN NO. : 26150716GJMXCV1536

Schedule 1 - Capital / भांडवल

आकडे ₹ हजारमध्ये '000'

PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
Authorised Capital	**अधिकृत भागभांडवल**	2,50,000.00	2,50,000.00
(9,00,000 SHARES OF Rs.25 each) & (22,75,000 SHARES OF Rs.100each)			
Issued Capital		**1,37,386.18**	**1,32,170.97**
Paidup Share Capital	वसुल भागभांडवल	**1,37,386.18**	**1,32,170.97**
Subscribed Capital		**1,37,386.18**	**1,32,170.97**
Called Up Capital			—
Total	**एकूण**	**1,37,386.18**	**1,32,170.97**

Schedule 2 - Reserve & Surplus / राखीव आणि नफा

आकडे ₹ हजारमध्ये '000'

PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
I Statutory Reserve	**विधी विहीत गंगाजळी निधी**	**1,74,655.46**	**152,424.28**
1 Reserve Fund Account	राखीव निधी	1,74,655.46	1,52,424.28
Ii Capital Reserves	**भांडवल राखीव निधी**	**---**	**---**
Iii Share Premium	**भागावरील प्रिमियम**	**---**	**---**
Iv Revenue And Other Reserves	**राखीव व इतर निधी**	**5,83,539.19**	**5,30,063.96**
1 Building Fund	इमारत निधी	1,15,143.48	97,556.48
2 Bank Development Fund	बँक विकास निधी	19,986.00	19,986.00
3 Special Reserve	विशेष राखीव निधी	16,056.72	15,681.72
4 Silver Jubilee Fund	रौप्य महोत्सव वर्ष निधी	7,490.00	7,490.00
5 Social Welfare Fund	सामाजिक कल्याण निधी	5,516.94	5,016.94
6 Member Welfare Fund	सभासद कल्याण निधी	17,539.18	16,539.18
7 Staff Welfare Fund	सेवक कल्याण निधी	11,948.66	10,950.76
8 Investment Fluctuation Reserve	गुंतवणुक चढ उतार निधी	60,104.00	46,604.00
9 Investment Depreciation Reserve	गुंतवणुक घसारा निधी	47,275.16	34,175.16
10 Reserve For Doubtful Debts	संशयित बुडीत निधी	1,59,795.29	1,54,732.79
11 Reserve For Interbank Deposit	अंतर्गत बँक गुंतवणुक निधी	79,483.30	79,483.30
12 Contingent Prov. For Std. Assets	आकस्मित तरतुद निधी	14,520.97	14,020.97
13 Director & Staff Training Fund	संचालक व सेवक प्रशिक्षण निधी	10,204.33	9,351.50
14 General Reserve	सामान्य राखीव निधी	18,475.16	18,475.16
V Balance Profit & Loss A/c	**नफा तोटा खाते**	73,281.47	69,708.95
Profit	नफा	73,281.47	69,708.95
Total (I+II+III+IV+V)	**एकूण**	**8,31,476.12**	**7,52,197.19**

Schedule 3 - Deposits / ठेवी

आकडे ₹ हजारमध्ये '000'

	PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
I	**Demand Deposit**	**मागणी ठेवी**	4,95,010.72	**3,93,470.21**
1	Current Account	चालु ठेवी	4,94,334.83	3,92,667.18
2	Credit Balance In Cash Credit	कॅश क्रेडिट खात्यावरील क्रेडीट बॅलन्स	---	5.52
3	DDS Security Deposit	दैनंदिन एजंट सुरक्षित ठेवी	675.89	797.51
II	**Saving Bank Deposits**	**बचत ठेवी**	**13,52,743.02**	**11,37,134.48**
1	Saving Deposit	बचत ठेवी	13,51,012.90	11,35,137.50
2	Basic Saving Account	बेसिक बचत ठेवी	684.41	634.87
3	Prerana Kishor Bachat Yojna	प्रेरणा किशोर बचत योजना	1,045.71	1,362.11
III	**Term Deposits**	**मुदत ठेवी**	**37,40,548.69**	**33,41,525.66**
1	DDS Deposit	दैनंदिन बचत ठेव	1,26,989.76	1,18,845.96
2	Recurring Deposit	आवर्त ठेव	26,018.75	23,008.46
3	Short Term Re-investment Deposit	अल्प मुदत पुनर्गुंतवणुक ठेव	2,41,953.42	1,60,088.02
4	Fixed Deposit	मुदत ठेव	22,74,141.83	18,04,178.99
5	Dam Duppat Deposit	दाम दुप्पट ठेव	6,306.82	6,659.06
6	F. D.regular Pension Scheme	मासिक पेन्शन ठेव	8,30,388.19	6,83,923.50
7	F. D. Regular Pension Scheme(Qis)	तिमाही पेन्शन ठेव	2,19,739.53	79,429.29
8	DDS Agent Security Fixed Deposit	दैनंदिन एजंट सुरक्षित मुदत ठेव	857.39	721.00
9	Prerana Plus (TD)	प्रेरणा प्लस टर्म मुदत ठेव	5.00	5.00
10	Prerana Silver Jubilee Sch (Mis)	प्रेरणा रौप्य महोत्सवी मासिक ठेव	1,900.00	94,712.17
11	Prerana Silver Jubilee Sch (Qis)	प्रेरणा रौप्य महोत्सवी तिमाही ठेव	400.00	84,410.30
12	Prerana Silver Jubilee Sch (TD)	प्रेरणा रौप्य महोत्सवी मुदत ठेव	1,943.30	1,55,170.47
13	Prerana Amrut Kalash Sch (Mis)	प्रेरणा अमृत कलश मासिक ठेव	4,830.50	89,125.13
14	Prerana Amrut Kalash (Qis)	प्रेरणा अमृत कलश तिमाही ठेव	3,921.28	34,040.09
15	Matured But Not Paid	मुदत संपलेल्या ठेवी	1,152.92	7,208.22
	Total	**एकूण**	**55,88,302.43**	**48,72,130.35**

Schedule 4 - Borrowing / घेतलेली कर्ज

आकडे ₹ हजारमध्ये '000'

	PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
I.	**Borrowing in India**	**भारतातील कर्जे**	**0.00**	**0.00**
	(i) Reserve Bank of India	रिझर्व्ह बँकेकडून घेतलेली कर्जे	0.00	0.00
	(ii) Other banks	इतर बँकेकडून घेतलेली कर्जे	0.00	0.00
	(iii) Other institutions & agencies	इतर संस्था व एजन्सी यांचेकडून घेतलेली कर्जे	0.00	0.00
II.	**Borrowings outside India**	**भारताबाहेरील कर्जे**	**0.00**	**0.00**
	Total : (I+II)	**एकूण**	**0.00**	**0.00**

Schedule 5 - Other Liabilites & Provisions / इतर देणी आणि तरतुदी आकडे ₹ हजारमध्ये '000'

PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
I Bills Payable	**बिल्स पे एबल**	**6,348.62**	**7,806.60**
1 Pay order Payable	पे ऑर्डर पे एबल	3,333.26	4,684.96
2 Unclaimed Payslip Payable	अन क्लेम पे ऑर्डर	3,015.36	3,121.64
Ii Inter-office Adjustment (net)	**शाखा अंतर्गत जुळवणी**	**- 61.44**	**0.00**
1 Branch Adjustment	शाखा जुळवणी	- 61.44	0.00
Iii Interest Accrued	**देय व्याज**	**3,547.24**	**3,194.29**
1 Interest Payable On Matured Deposit	मुदत संपलेल्या ठेवीवरील देय व्याज	60.50	691.48
2 Interest Payable On Pigmy Deposit	दैनंदिन ठेवीवरील देय व्याज	1,435.96	1,319.58
3 Interest Payable	देय व्याज	2,050.78	1,183.23
Iv Other Liabilities	**इतर देणी**	**83,423.74**	**69,046.65**
1 T. D.S. payable	टि.डी.एस.	2,812.47	2,554.97
2 Audit Fees Payable	ऑडिट फी	1,294.64	910.15
3 Other Expenses Payable	इतर खर्च देणे	492.10	470.16
4 Dividend Payable	लाभांश देणे	3,097.86	3,344.65
5 CGST Payable	सीजीएसटी	520.43	564.24
6 SGST Payable	एसजीएसटी	520.43	564.24
7 Amt Recd From Nfs For Credit To Customer	एन.एफ.एस. मधील खातेदारांची जमा रक्कम	19.11	19.11
8 Atm Amt. Recd.as Aquirer For Payable	ए.टी.एम. वरील रक्कम देय	172.60	172.60
9 Advocate Fees Payable	वकील फी	0.00	264.00
10 Income Tax Payable	इन्कम टॅक्स	28,100.00	19,600.00
11 Electricity Bill Payable	विज बील देय	43.50	56.30
12 Closing Allowance Payable	क्लोजिंग अलौन्स	434.00	384.00
13 Excess Cash	जादा रक्कम	72.41	52.41
14 Sundry Creditors	इतर येणी	998.46	1,053.61
15 Rupay Pos	रुप्ये पॉझ	535.76	708.45
16 UPI	युपीआय	2,279.97	654.98
17 Pos & Ecom Sett Amt Diff Earnmark	पॉझ व इकॉम सेटेलमेंट रक्कम देय	203.71	203.70
18 Advance Bank Guarantee Commission	बँक हमी पोटी अगाऊ कमिशन	19.62	2.68
19 Banks Network Settelement Gl	बँक नेटवर्क सेटलमेंट	653.23	62.12
20 Provision For Income Tax Payable	देय आयकराची तरतूद	0.00	1,000.00
21 Provision For Prof. Tax	व्यवसाय कर तरतूद	25.20	22.80
22 Overdue Penal Interest Reserve	दंड चार्जेस येणे	3,964.65	3,415.73
23 Overdue Interest Reserve	थकीत व्याज तरतूद	36,065.83	32,774.69
24 Salary & Allowances Payable	पगार आणि भत्ते देणे	0.00	72.00
25 Rent & Taxed Payable	भाडे आणि टॅक्स देणे	1,097.76	119.06
Total	**एकूण**	**93,258.16**	**80,047.54**

Schedule 6 - Cash & Bank Balances With RBI / रोख शिल्लक / RBI सह आकडे ₹ हजारमध्ये '000'

PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
A Cash In Hand	**रोख शिल्लक**	**35,335.73**	**28,288.77**
I Cash In Hand	रोख शिल्लक	28,714.63	22,279.87
Ii Cash In Atm	एटीएम मधील शिल्लक	6,621.10	6,008.90
B Balance With Reserve Bank Of India	**रिझर्व्ह बँक शिल्लक**	**1,00,000.00**	**1,20,000.00**
Balance In RBI Current A/c	आर.बी.आय. चालू खात्यावरील शिल्लक	1,00,000.00	1,20,000.00
Total	**एकूण**	**1,35,335.73**	**1,48,288.77**

Schedule 7 - Balances with Banks and Money at Call Short Notice/बँकांमधील शिल्लक आकडे ₹ हजारमध्ये '000'

PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
I Balance With Banks	**बँकेतील शिल्लक**	**91,975.27**	**1,33,292.58**
I P.D.C.C. Bank C/a	पी.डी.सी.सी. बँक	1,280.13	2,145.17
II M.S.C. bank C/a	एम.एस.सी. बँक	11.61	11.51
III HDFC IMPS A/c	एच.डी.एफ.सी. बँक (आय.एम.पी.एस. खाते)	1,737.64	3,359.06
IV IDBI Bank C/a	आय.डी.बी.आय. बँक	31,563.19	29,062.08
V ICICI (ATM) A/c	आय.सी.आय.सी.आय. बँक (एटीएम खाते)	9,808.76	6,361.80
Vi HDFC RTGS A/c	एच.डी.एफ.सी. बँक (आर.टी.जी.एस.खाते)	12,097.30	37,314.22
Vii P.D.C.C. Nasarapur Branch	पी.डी.सी.सी. बँक नसरापूर शाखा	1,050.00	50.00
Viii IDBI Bank (clearing)	आय.डी.बी.आय. बँक (क्लिअरींग खाते)	24,838.73	36,311.26
X IDFC First Bank C/A	आय.डी.एफ.सी. फर्स्ट बँक	14.01	14.01
Xi HDFC (UPI-A/C No. 3664)	एच.डी.एफ.सी. बँक (युपीआय खाते)	7,946.71	14,765.25
Xii P.D.C.C. Kasar Amboli Branch	पी.डी.सी.सी. बँक कासार अंबोली शाखा	10.73	510.82
Xiii P.D.C.C. Vadgaon Dhayari Branch	पी.डी.सी.सी. बँक वडगाव धायरी शाखा	26.73	26.82
Xiv P.D.C.C. Perne Phata Branch	पी.डी.सी.सी. बँक पेरणे फाटा शाखा	1,532.91	1,732.99
Xv P.D.C.C. Katraj Branch	पी.डी.सी.सी. बँक कात्रज शाखा	56.82	1,627.59
Ii Other Deposit Accounts	**इतर मुदत ठेवी**	**7,62,843.48**	**7,02,418.48**
I Investment In P.D.C.C. Bank	पी.डी.सी.सी. बँक मुदत ठेव	1,00,000.00	50,000.00
II Investment In IDBI Bank	आय.डी.बी.आय. बँक मुदत ठेव	1,09,900.00	85,000.00
Iii Investment In Shamrao Vitthal Co Op Bank	शामराव विठ्ठल बँक मुदत ठेव	50,000.00	50,000.00
Iv Investment In HDFC Bank	एच.डी.एफ.सी. बँक मुदत ठेव	25,318.48	25,318.48
V Investment In Ratnakar Bank	रत्नाकर बँक मुदत ठेव	50,000.00	50,000.00
Vi Investment In Suryoday Small Fin.bank	सुर्योदय स्मॉल फायनान्स बँक मुदत ठेव	40,025.00	50,000.00
Vii Investment In CSB Bank	सी.एस.बी. बँक मुदत ठेव	50,000.00	50,100.00
Viii Investment In DCB Bank	डी. सी.बी. बँक मुदत ठेव	50,000.00	50,000.00
Ix Investment In AU Small Fin.bank	ए. यु. स्मॉल फायनान्स बँक मुदत ठेव	50,000.00	50,000.00
X Investment In Bandhan Bank	बंधन बँक मुदत ठेव	50,000.00	50,000.00
Xi Investment In TJSB Bank	ठाणे जनता सह. बँक मुदत ठेव	--	30,000.00
Xii Investment In Ujjivan Small Fin.bank	उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मुदत ठेव	30,000.00	30,000.00
Xiii Investment In Vishveshwar Bank	विश्वेश्वर बँक मुदत ठेव	10,000.00	--
Xiv Investment In Indusind Bank	इंडसइंन्ड बँक मुदत ठेव	50,000.00	--
Xv Investment In Saraswat Bank	सारस्वत बँक मुदत ठेव	30,000.00	50,000.00
Xvi Investment In Equitas Small Finance Bank	ईक्विटास् स्मॉल फायनान्स बँक मुदत ठेव	50,100.00	49,500.00
Xvii Investment in Jana Small Finance Bank	जना स्मॉल फायनान्स बँक मुदत ठेव	17,500.00	32,500.00
Total	एकूण	**8,54,818.75**	**8,35,711.06**

Schedule 8 - Investments / गुंतवणूक

आकडे ₹ हजारमध्ये '000'

PARTICULAR		31/03/2026	31/03/2025
I Investment in India	**भारतातील गुंतवणूक**	2,189,180.77	1,915,369.54
1 Investment in Government Security	सरकारी कर्ज रोख्यामधील गुंतवणुक	2,189,147.72	1,815,846.94
2 Investment in Treasury Bills	ट्रेझरी बिल्स्मधील गुंतवणूक	-	99,489.55
3 Shares	शेअर्स	33.05	33.05
II Others	**इतर**	**99,354.12**	**99,354.12**
1 Perpetual Non Cummu.Preference Shares	नॉन क्यूम्युलेटिव्ह प्रेफ्रन्स शेअर्स	79,483.30	79,483.30
2 Equity Warrant of Unity Bank	युनिटी बँक इक्विटी वॉरंट्स्	19,870.82	19,870.82
Total	**एकूण**	**2,288,534.89**	**2,014,723.66**

Schedule 9 - Advances / कर्ज

आकडे ₹ हजारमध्ये '000'

	PARTICULAR	तपशिल	31/03/2026	31/03/2025
A(i)	Bills Purchased And Discounted	बिल्स् पर्चेस आणि डिस्काऊंट	0.00	0.00
	(ii) Cash Credits,overdrafts & Loans Repayable On Demand	**कॅश क्रेडिट, ओव्हरड्राफ्ट आणि मागणी कर्ज**	**7,90,808.22**	**5,54,537.06**
1	Cash Credit	कॅश क्रेडिट	47,724.13	23,862.61
2	Prerana Pragati Cash Credit	प्रेरणा प्रगती कॅश क्रेडीट	911.32	1,243.15
3	Credit Balance in Cash Credit	कॅश क्रेडिट खात्यावरील शिल्लक रक्कम	--	5.52
4	FD Overdraft A/c	मुदत ठेवीवरील ओव्हरड्राफ्ट	52,333.97	40,158.90
5	Loan Against Pigmi Deposit	दैनंदिन ठेवीवरील कर्ज	11.85	10.20
6	Loan Against Govt.Securities	सरकारी रोख्यांवरील कर्ज	3,180.71	3,155.70
7	Loan Against Fixed Deposit/ Reinvestment	मुदत ठेव तारण कर्ज	3,29,708.40	3,17,497.85
8	Loan Against Recurring Deposit	आवर्तक ठेव तारण कर्ज	--	12.73
9	Gold Loan A/c	सोने तारण कर्ज	3,23,003.81	1,47,912.49
10	Gold Loan Above 2 Lakh	रु. २ लाखावरील सोने तारण कर्ज	33,934.03	20,677.91
	(iii) Term Loans	**मुदत कर्ज**	**19,98,979.72**	**17,79,978.14**
1	Prerana Pragati Loan Scheme	प्रेरणा प्रगती कर्ज	1,575.55	3,387.50
2	Comm.Vehicle Loan A/c	व्यावसायिक वाहन कर्ज	1,88,133.77	1,06,651.30
